आजचा शुभ विचार

स्वप्ने पाहणाऱ्यांना अडथळे आव्हानांचे संकेत म्हणून दिसतात, निराशेचे नाही. स्वप्नांच्या पीछ्याने जाताना, तुमच्या मनाची शक्ती वाढते.

RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!




मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-68 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Wednesday 16 July 2025 ▪ PAGES 6 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ६८ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ बुधवार, दि. १६ जुलै २०२५ ▪ पाने ६ ▪ ₹ ४ रुपये

## 'त्रिभाषे'वर फडणवीस सरकारचा 'फुल रिव्हर्स'; सरकार द्वारा नियुक्त डॉ. जाधव समितीवर प्रश्नचिन्ह

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---






राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीत राज्यात हिंदी भाषेच्या सक्तीवरून चांगलाच राजकीय गदारोळ झाला. मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी थेट भाजप महायुती सरकारलाच आव्हान दिलं. उद्धव ठाकरेंनी देखील मराठीत कोणतीच तडजोड खपवून घेणार नसल्याचा इशारा दिला.

भाजप महायुतीच्या हिंदी सक्तीच्या धोरणामुळे ठाकरे बंधू एकत्र आले. हिंदी भाषेच्या सक्तीचा निर्णय भाजप महायुती सरकारची डोकेदुखी ठरली. यामुळे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील शालेय अभ्यासक्रमातून त्रिभाषा धोरणालाच वगळण्याचा निर्णय घेतला आहे. भाषा धोरणाच्या अभ्यासासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे काय? असा प्रश्न आता केला जात आहे.

राज्यात त्रिभाषा सूत्राची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यातील भाजप महायुती सरकारने शालेय शिक्षण विभागाने तिसरी भाषा म्हणून हिंदी विषय पहिलीपासून अनिवार्य केला होता. त्यावर विरोध झाल्यानंतर तो विषय ऐच्छिक करण्यात आला. त्यावर मराठीविरुद्ध 'हिंदी'चा वाद आणि त्यावर राजकीय आंदोलने पेटल्यानंतर यासाठीचे दोन्ही विषयाचे सरकारी निर्णय रद्द करण्यात आले आणि त्रिभाषा सूत्रासंदर्भात डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली.

आता पुढील पाऊल म्हणून शालेय शिक्षण विभागाने यंदाच्या शैक्षणिक वर्षात त्रिभाषा धोरणच वगळून एनईपीची अंमलबजावणी करण्याचा सुधारीत निर्णय जारी केला आहे. यंदाच्या शैक्षणिक वर्षात पहिलीपासून नवीन अभ्यासक्रमाची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. यासाठी तिसऱ्या भाषेचा पर्यायही देण्यात आला होता. त्यासाठीचे वेळापत्रकही जाहीर करण्यात आले होते. मात्र आता सुधारीत सरकारी निर्णय जारी करण्यात आल्याने तिसऱ्या भाषेच्या ठिकाणी कौशल्यविषयक, सैनिकी अभ्यासक्रम, कला, क्रीडा आदी अभ्यासक्रमांचा समावेश होण्याची शक्यता आहे. यासाठीचा सुधारित वेळापत्रक आणि पर्यायी अभ्यासक्रम लवकरच जाहीर केले जाण्याची शक्यता आहे. शालेय शिक्षण विभागाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या (एनईपी) अंमलबजावणीतून तिसऱ्या भाषेची सक्ती आणि त्रिभाषा धोरणाचे सूत्रच वगळले असून या निर्णयाचे साहित्यिक, भाषाभ्यासक, मराठी भाषातज्ज्ञांकडून स्वागत होत आहे.

शालेय शिक्षण विभागाने 'एनईपी'च्या अंमलबजावणीत अभ्यासक्रमातून त्रिभाषा धोरणाला तूर्तास वगळले असले तरी या धोरणाचा अभ्यासासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली आहे. त्या समितीने त्रिभाषेच्या संदर्भा सकारात्मक, असा अहवाल पुढील तीन महिन्यात दिल्यास त्यावर काय होणार? असे प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत.

## मुलांना मराठीसह इंग्रजी बोलता आलं पाहिजे, त्यासाठी राज ठाकरेंनी सुचवला योग्य पर्याय

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---



राज्य सरकारने राज्यात तृतीय भाषेचे धोरण लागू करताना पहिलीपासून हिंदी विषय सक्तीचा केला होता. मात्र मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शालेय शिक्षण विभागाच्या या धोरणाला कडाडून विरोध केला. मुंबईत आंदोलनाचा इशारा दिला. राज्यातून तीव्र विरोध वाढल्यानंतर हिंदी सक्तीचा निर्णय रद्द करत असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

हिंदी सक्तीविरोधातील आंदोलन यशस्वी झाल्यानंतर राज ठाकरे यांनी आता इंग्रजी भाषेविषयी मोठा सल्ला दिला आहे. राज ठाकरे म्हणाले, आपल्या मुलांना मराठीसह इंग्रजी बोलता आले पाहीजे, हे महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील प्रत्येक पालकाचे स्वप्न असते. त्यामुळे जर खरोखर सरकारला मराठी शाळा टिकवायच्या असतील तर त्या सेमी इंग्रजी करणे गरजेचे आहे असे मत राज ठाकरे यांनी व्यक्त केलं आहे. राज ठाकरे हे नाशिकमध्ये आयोजित शिबिरस्थळी माध्यमांशी बोलत होते. मराठी शाळांमध्ये सेमी इंग्रजीची गरज आहे हे सांगताना राज ठाकरे यांनी बालमोहन शाळेचे उदाहण दिले. मुंबईतील ही शाळा असून या शाळेला सेमी इंग्रजी केल्यानंतर प्रवेशासाठी प्रतीक्षा यादी लागते, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली. त्यामुळे या माध्यमातून राज्यातील प्रत्येक शाळा सेमी इंग्रजी माध्यमाची व्हावी असा सल्ला राज ठाकरे यांनी सरकारला दिला आहे.

दरम्यान त्यांनी त्रिभाषा सूत्राबाबत बोलताना उद्धव ठाकरे यांची पाठराखण केली. त्रिभाषा सूत्र उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना स्वीकारल्याचा दावा राज ठाकरे यांनी फेटाळून लावला. ते म्हणाले, उद्धव ठाकरे ज्यावेळी मुख्यमंत्री होते त्यावेळी केंद्र सरकारकडून त्रिभाषा सूत्राचा अहवाल आला होता, मात्र निर्णय झालेला नव्हता. त्रिभाषा सूत्राबाबत केंद्र सरकारकडून अहवाल आल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी समिती नियुक्त करून हा विषय बाजूला ठेवला होता. मात्र, महायुती सरकारने त्रिभाषा सूत्राची अंमलबजावणी सुरू केली', असे सांगत राज यांनी उद्धव ठाकरे यांचे समर्थन करत बाजू घेतली.

दरम्यान नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी येथे मनसेचं राज्यस्तरीय शिबीर होत आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हे शिबीर आयोजित केलं आहे. कालपासून या शिबीराला सुरुवात झाली असून स्वत:राज ठाकरे कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत आहे. याच ठिकाणी त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यासोबतच्या युतीबाबत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. युतीचा निर्णय वेळ घेणारा असतो. युतीबाबतच्या निर्णयाची नोव्हेंबर-डिसेंबरपर्यंत वाट बघा असं सांगितलं आहे.

## शालार्थ प्रणालीत बोगस शिक्षकांची नावे; SIT चौकशी होणार शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांचा निर्णय

### शाळेत राष्ट्रगीतानंतर राज्यगीत बंधनकारक : शिक्षण मंत्री दादाजी भुसे

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---




राज्यातील अपात्र शिक्षक-शिक्षकेतर कर्मचार्यांची नावे शालार्थ प्रणालीत नियमबाह्य समाविष्ट केल्याच्या प्रकरणी एसूआयटीद्वारे (विशेष अन्वेषण पथक) चौकशी केली जाईल. जे दोषी आढळतील, त्या सर्वांवर कठोर कारवाई केली जाईल, अशी घोषणा शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी सोमवारी विधानसभेत लक्षवेधीच्या उत्तरात केली. आमदार प्रवीण तायडे यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडतांना सांगितले की, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी भरतीत कोट्यवधी रुपयांचा आर्थिक भ्रष्टाचार होत आहे. काही राजकीय व्यक्ती, माजी राज्यमंत्री यामध्ये सहभागी आहेत. बोगस शिक्षकांना थकित वेतनही देण्यात आले आहे. शाळांना अल्पसंख्याक दर्जा मिळवून देण्यासाठी १० लाख रुपयांची मागणी केली जाते. याविषयी शिक्षण मंत्री दादाजी भुसे म्हणाले की, शिक्षक भरती गुणवत्तापूर्ण व्हावी, ही शासनाची भूमिका आहे. १९ सहस्र उमेदवारांची भरती झाली असून १० सहस्र जागांवर प्रगतीपथावर आहे. अल्पसंख्यांक विकास विभागाद्वारे शाळांना प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही केली जाते. अल्पसंख्यांक दर्जा मिळवून देण्यासाठी १० लाख रुपयांची मागणी होत आहे, याविषयी तक्रार प्राप्त नाही. राज्यातील सर्व शाळांना मराठी शिकवणे बंधनकारक असून शाळेत राष्ट्रगीतानंतर राज्यगीत लावणे बंधनकारक असेल, असे शिक्षणमंत्री भुसे यांनी यावेळी सांगितले.

## मुंबईत BEST च्या डबलडेकर बसला आग, प्रवासी सुरक्षित

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---



छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस जवळ BEST च्या १३८ क्रमांकाच्या डबलडेकर बसला आग लागली. धूर येऊ लागल्याचे लक्षात येताच चालकाने बस रस्ताच्या कडेला थांबवली. प्रवासी, वाहक आणि चालक वेगाने बसमधून बाहेर पडले. बसमधून सर्वजण सुरक्षितरित्या बाहेर पडले आहेत. तातडीने अग्निशमन दलाच्या पथकाला बोलावण्यात आले. अग्निशमन दलाने बसच्या आगीवर लवकरच नियंत्रण मिळवले. दुर्घटनेत जीवितहानी झालेली नाही. बसला आग लागल्याप्रकरणी चौकशी सुरू आहे. आग लागण्याचे कारण अद्याप समजलेले नाही.

महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक स्वराज्यदूत वृत्तपत्रातर्फे
राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन !

स्वराज्यदूत गौरव पुरस्कार
कर्तृत्वाचा सन्मान... स्वराज्याचा मान !!



महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, उद्योग, वैद्यकीय, पत्रकारिता (वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक / डिजीटल मीडिया), युवक, महिला, कला, साहित्य, क्रीडा, पर्यावरण, ग्रामविकास अशा विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनिय कार्य करणाऱ्या संस्था व मान्यवर व्यक्तींच्या कार्याचा विशेष सन्मान करून भावी वाटचालीस तसेच उल्लेखनिय कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून दैनिक स्वराज्यदूतने हा पुरस्कार आयोजित केलेला आहे.

कौतुक तुमच्या कार्याचे

दैनिक स्वराज्यदूत SWARAJYADOOT
www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!
SWARAJYADOOT LIVE

दैनिक वृत्तपत्र
वृत्त वाहिनी

ऑगस्ट महिन्यात नाशिक येथे अतिशय भव्य-दिव्य समारंभात पुरस्कार वितरण नियोजित

प्रस्ताव पाठविण्यासंदर्भात सूचना

- संपूर्ण प्रस्ताव pdf स्वरुपात संगणकावर तयार केलेल्या स्वरुपात दि. ३१ जुलै २०२५ पर्यंत फक्त Google Form द्वारेच पाठवायचा आहे. गुगल फॉर्म लिंक 8446673677 या व्हॉटसअप वर उपलब्ध केली आहे. उपलब्ध झाली नसेल तर तशी मागणी करू शकतात.
- फक्त निवड झालेल्या व्यक्तींना प्रस्तावाची प्रिंट स्वरुपात (Hard copy) जमा करावी लागेल.
- प्रस्ताव पूर्णपणे मोफत स्वीकारले जातील. कोणताही आर्थिक मोबदला देण्याचा प्रयत्न करू नये. पुरस्कारासाठी कुणाशीही आर्थिक व्यवहार करू नये.
- दैनिक स्वराज्यदूत परिवाराशी संबंधित व्यक्ती, प्रतिनिधी यांना प्रस्ताव पाठवता येणार नाहीत.
- जिल्हा परिषद कर्मचारी, राज्य व केंद्र सरकारचे कर्मचारी यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही.

अधिक माहितीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
8446673677 / 8010232449

अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

संपादकीय

# भ्रष्टाचाराचे पूल

गेल्या काही महिन्यांपासून देशामध्ये पूल कोसळण्याच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. त्यामुळे पुलांची सुरक्षितता हा विषय सध्या ऐरणीवर आला. एकतर पूल अनेक वर्षे जुने असल्याने जीर्ण झालेले असतात. त्यांचा वापर करण्याची कालमर्यादा संपुष्टात आल्यावरही वापर सुरूच असतो. त्यामुळे धोकादायक अवस्थेत वापर सुरू असणाऱ्या पुलांचा अंत हा अपघातांमध्ये ठरलेलाच असतो. या पुलावरून जाणे धोकादायक आहे, हे माहीत असतानाही जीव मुठीत घेऊन वाहनचालक आपली वाहने या पुलावरून हाकतात. दुसरीकडे जुनाट पुलांची दुर्घटना समजण्यासारखी असली तरी नव्याने बांधकाम सुरू असलेले पूल कोसळणे तसेच पूल बांधून काही वर्षे अथवा काही महिनेच झालेले असताना पूल कोसळणे या घटनाही घडल्या आहेत. नवीन पूल कोसळणे म्हणजे पुलाचे बांधकाम व्यवस्थित न होणे, यातच सर्व काही आले.

पुलाच्या बांधकामामध्ये निकृष्ट दर्जाचा माल वापरणे याची परिणती त्या पुलाच्या दुर्घटनेत होते. भारतात विकासकामांमध्ये होत असलेला भ्रष्टाचार ही जगजाहीर बाब आहे. ग्रामपंचायत पातळीपासून केंद्रीय स्तरापर्यंत होत असलेल्या विकासकामांमध्ये ठेकेदार, प्रशासन, लोकप्रतिनिधी यांच्यामध्ये होत असलेला आर्थिक मनोमिलाफ ही बाब आता लपून राहिलेली नाही. १९८५ साली राजीव गांधी हे देशाचे पंतप्रधान असताना त्यांनी भारतामध्ये होत असलेल्या विकासकामांमध्ये एक रुपयांपैकी केवळ १५ पैसे विकासकामांवर खर्च होत असून ८५ पैसे हे भ्रष्टाचारात जात असल्याचे जाहीरपणे सांगितले होते. पूल दुर्घटनेमध्ये अनेक वर्षे जुने, धोकादायक अवस्थेत झालेल्या पूल दुर्घटनेला पूर्णपणे त्या त्या भागातील प्रशासनच जबाबदार असते. पुलनिर्मितीला ठरावीक वर्षाचा कालावधी लोटल्यावर त्या पुलाचे पाडकाम करून त्या ठिकाणी नवीन पुलाची उभारणी करणे हे प्रशासनाचे कर्तव्य असते. जुनाट पुलांचा वापर म्हणजे अपघातांना निमंत्रण हे समीकरण ठरलेलेच असते. दोन्ही प्रकारातील पुलांच्या दुर्घटना झाल्यावर या अपघातांची शासन जबाबदारी स्वीकारते, हे आजतागायत कधीही पाहावयास मिळालेले नाही. केवळ राजकीय नेत्यांची घटनास्थळी गर्दी, पीडितांचे सांत्वन, स्थानिक प्रशासकीय अधिकाऱ्यांना दमदाटी, बदली अथवा निलंबनाचे ठरलेले सोपस्कर व मृतांच्या तसेच जखमींच्या परिवाराला आर्थिक मदत हा सर्व प्रकार ठरलेलाच असतो. त्यात कोणताही बदल पाहावयास मिळत नाही. पुलाचे अपघात कोठेही घडले तरी प्रकार हाच घडत असतो. गुजरातमधील पद्रा तालुक्यातील मही नदीवर पूल कोसळल्याने जवळपास १५ जणांचा मृत्यू झाला. पूल कोसळल्यानंतर नदीत पडल्याने काहीजण जखमी झाले. काहीजणांना वाचविण्यात स्थानिक रहिवाशांमुळे शक्य झाले. या पूल दुर्घटनेची दखल पंतप्रधान मोदी यांनी घेतली. हा पूल जवळपास ४५ वर्षे जुना असून या पुलाच्या दुरवस्थेबाबत, असुरक्षितपणाबाबत अभियांत्रिकी अहवालही अनेकदा प्रकाशित झाले होते. स्थानिक राजकीय नेत्यांनीही त्या प्रकरणी आवाजही उठविला होता. पण प्रशासनाने लक्ष दिले नाही. त्यामुळे स्थानिक प्रशासनाच्या निष्काळजीपणावर आता प्रश्नचिन्ह उपस्थित होणे स्वाभाविकच आहे. कारण या घटनेला सर्वस्वी स्थानिक प्रशासनच जबाबदार आहे.

१९८६ मध्ये बांधलेला हा पूल मुजपूर आणि गंभीर गावांना जोडणारा होता. गेल्या काही वर्षांपासून या पुलावर दृष्यमान झीज दिसत होती. रस्ते आणि इमारत (आर अँड बी) विभागाला पाठवलेल्या पत्रांच्या प्रती समोर आल्या आहेत, ज्यात पुलाच्या खराब अवस्थेबाबत स्पष्टपणे नमूद करण्यात आले होते. ऑगस्ट २०२२ मध्ये वडोदरा जिल्हा पंचायतीचे सदस्य हर्षदसिंह परमार यांनी एक पत्र लिहून सरकारला इशाराही दिला होता. संरचनात्मक मूल्यांकन अहवालात हा पूल 'वापरासाठी अयोग्य' ठरविण्यात आला होता. तरीही, कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नाही. पूल कोसळेपर्यंत त्यावर वाहनांची ये-जा अनिर्बंधपणे सुरू होती. या घटनेने गुजरातमधील जुन्या पायाभूत सुविधांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न निर्माण केले आहेत. गंभीर पूल दुर्घटनेने राज्यभरातील जुन्या पुलांचे आणि इतर संरचनांचे ऑडिट करण्याची मागणी तीव्र झाली. महाराष्ट्रातील पुण्यामध्येही काही दिवसांपूर्वीच कुंडमाळा येथे इंद्रायणी नदीवरील पूल कोसळला, ज्यात काही पर्यटक वाहून गेले. हा पूल काही दिवसांपूर्वीच वापरासाठी बंद करण्यात आला होता, पण तरीही लोक त्यावर फिरत होते. या दुर्घटनेत ६ जणांचा मृत्यू झाला, तर ३२ जण जखमी झाले होते. नऊ वर्षांपूर्वी महाराष्ट्रात झालेली महाड पूल दुर्घटना अजूनही लोकांच्या स्मरणात आहे. तब्बल तेरा दिवस या दुर्घटनेतील लोकांना शोधण्याचे शोधकार्य सुरूच होते. या अपघातात महाडजवळील सावित्री नदीच्या पात्रात दोन एसटी बस आणि एक तवेरा कारही वाहून गेली होती. १८ ते २० जणांचा महाड दुर्घटनेत मृत्यू झाला होता. दुर्घटना घडल्यावर काही काळ चर्चा होते. दुर्घटना कशामुळे घडली असेल, त्यावर विचारमंथन होते. काही वेळा समिती नेमली जाते. दुर्घटनेनंतर निर्माण झालेला जनप्रक्षोभ शमविण्यासाठी काही अधिकाऱ्यांवर खापर फोडताना त्यांची बदली व वेळ पडल्यास निलंबनही केले जाते. पुढे त्या समितीचा काय अहवाल आला, काय कारवाई झाली, हे कोणालाही माहिती पडत नाही. कारण त्यानंतर इतक्या घटना घडतात की, जुन्या घटनांचे लोकांना विस्मरण होत असते. पूल दुर्घटनेबाबत ठेकेदाराला अथवा प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कारवाई काय झाली? ठेकेदाराच्या कंपनीला काळ्या यादीत टाकले का, याचेही कोणाला स्वारस्य नसते. जुन्या पुलांवरील वाहतूक शक्य तितक्या लवकर बंद करून पाडकाम न झाल्यास अपघाताच्या घटनांना आळा बसणार नाही आणि अपघातामध्ये घडणाऱ्या अपघातातील मृत्यूचे तांडवही थांबणार नाही. नवीन पूल कोसळल्यावर सदोषपणा अथवा निकृष्ट बांधकाम उजेडात येते. पण जुनाट, जीर्ण झालेल्या पुलांवर तरी तोडगा काढणे आपणास शक्य आहे. त्यासाठी जनतेमध्ये जागृती असणे आवश्यक आहे. जनसामान्यातील जनजागृतीचा रेटा वाढला की, प्रशासनालाही माघार घ्यावी लागते, निर्णय घ्यावा लागतो. जुनाट पुलावरील वाहतूक थांबविण्याबाबत शीघ्र कृती होणे काळाची गरज आहे.

# सरपंच क्रांती पाटील यांची भाजपा प्रदेश कार्यकारणी पदी नियुक्ती

संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------



शिंदखेडा तालुक्यातील रहिमपुरे (रामनगर) येथील सरपंच क्रांती अरुण पाटील यांची महाराष्ट्र भाजपा प्रदेश कार्यकारणी पदी पणन व राजशिष्टाचार कॅबिनेट मंत्री जयकुमार रावल यांच्या सूचनेनुसार नियुक्ती करण्यात आली. सरपंच क्रांती पाटील हे मागील चार वर्षापासून गावाची यशस्वीपणे धुरा सांभाळत आहेत. मागील चार वर्षात त्यांनी मंत्री जयकुमार रावल यांच्या मार्गदर्शनाखाली गावात नवीन ग्रामपंचायत कार्यालय इमारत, महादेव मंदिर सभा मंडप स्मशानभूमी संरक्षण भिंत, गावांतर्गत काँक्रीटचे रस्ते, पेव्हर ब्लॉक, शेतकऱ्यांसाठी पाणंद रस्ते, गावात बंदिस्त गटार अशा प्रकारचे विविध विकासात्मक कामे वेळोवेळी पाठपुरावा करून करून घेतली. तसेच गावाचे नाव रहीमपुरे बदलून रामनगर करण्याचे काम कॅबिनेट मंत्री जयकुमार रावल यांच्या मार्गदर्शनाखाली वेळोवेळी मंत्रालय स्तरावर पाठपुरावा केला. तसेच शासनाच्या ज्या वैयक्तिक लाभाच्या योजना विषयी गावातील नागरिकांमध्ये वेळोवेळी मार्गदर्शन करून विविध योजनांचा लाभ मिळवून देण्याचे काम केले.या नियुक्ती बद्दल पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, दोंडाईचा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायण पाटील, भाजपा तालुका अध्यक्ष दीपक बागल, रामकृष्ण मोरे, डी एस गिरासे व सरपंच संघटनाने यांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या

# अन्यत्याग उपोषणाला अखेर यश;

## चर्चेअंती मध्यरात्री एक वाजेच्या सुमारास लेखी आश्वासनानंतर नगरसेविका सौ मनीषा देसले आणि मावळत्या नगराध्यक्ष जयश्री पवार यांनी सोडवले उपोषण

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------

साक्री आंदोलनाला अखेर यश मिळाले असून नगरपंचायतीच्या नगरसेविका सौ.मनीषा देसले आणि मावळत्या नगराध्यक्ष जयश्री पवार यांनी नगरपंचायत येथे अन्नत्याग उपोषण करीत शहराच्या विकासासाठी गेल्या तीन महिन्या पासून निविदा खुल्या केल्या जात नाही याचा तीव्र निषेध व्यक्त करीत आमरण उपोषणाचे हत्यार हाती घेतले होते. यावर आज शनिवारी रात्री नऊ वाजेच्या सुमारास उपोषण कर्त्या महिला लोकप्रतिनिधी यांची भेट उपजिल्हाधिकारी प्रदिप पठारे, मुख्याधिकारी देवेंद्रसिंह परदेशी यांनी घेत चर्चेअंती मध्यरात्री एक वाजेच्या सुमारास लेखी आश्वासनानंतर उपोषण सोडले आहे.

प्रभागातील विकास कामांसंदर्भात नगरसेवकांवर होणाऱ्या अन्याय विरोधात साक्री शहरातील नगरपंचायत कार्यालयात मनिषा देसले, जयश्री पवार ह्यांनी उपोषणाला बसत तात्काळ निविदा खुल्या करीत विकासकामे मार्गी लावण्याची मागणी केली होती.

साक्री नगरपंचायतीने प्रलंबित विकासकामांच्या निविदा तात्काळ खुल्या करून कामांना गती द्यावी, अन्यथा मुख्याधिकारी यांच्या दालनासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा प्रभाग क्रमांक पाचच्या नगरसेविका मनिषा महेंद्र देसले यांनी यापूर्वी दिला होता. त्यानुसार त्यांच्या सहकारी नगरसेवक आणि रहिवासी समवेत नगरपंचायतच्या कार्यालयात दि.११ पासून अन्नत्याग उपोषण सुरू केले होते .



उपोषणाच्या दूसर्या दिवस अखेर नऊ वाजेपासून सुरू असलेल्या चर्चेत मध्यरात्री एक वाजेच्या सुमारास
उपजिल्हाधिकारी प्रदिप पठारे, मुख्याधिकारी देवेंद्रसिंह परदेशी, पोलीस निरीक्षक दिपक वळवी यांनी भेट घेत चर्चेअंती लेखी आश्वासन देत निविदा प्रक्रियेवर लवकरच कार्यवाही करण्याचे लेखी पत्राद्वारे आश्वासन दिले. यावेळी नगरसेविका मनिषा देसले, माजी नगराध्यक्षा जयश्री पवार, जयश्री पगारिया, उज्वला भोसले, अँड्. पूनम काकुस्ते-शिंदे यांच्यासह सोनल पाटील, जया जाधव, हेमांगी मोहने, मंगल सोनवणे, भाग्यश्री पाटील, हर्षिता चित्ते, पुनम पाटील, सुवर्णा बोरसे, स्नेहल बोरसे, नगरसेवक दीपक वाघ, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष विजय भोसले, ऋषिकेश मराठे, महेंद्र देसले, विनोदकुमार पगारिया, हेमंत पवार, उत्पल नांद्रे, प्रदिप नांद्रे, योगेश दाभाडे, दिपक कोठावदे, रंगनाथ भवरे,गोपाळ ठाकरे, अजय लोणखेडे, प्रविण देसले, यश देवरे,अतुल दहिते,चेतन जाधव, सतिष पगार, भूषण नांद्रे, सचिन देसले, मयुर महाजन, प्रशांत पाटील आदी उपस्थित होते. याप्रसंगी पोलीस निरीक्षक दीपक वळवी संजय शिरसाठ शांताराम पाटील श्रीमती चव्हाण आदींनी चोख बंदोबस्त ठेवला होता

**मी नवीनच पदभार घेतल्याने संबंधित विषयाची परिपूर्ण माहिती नसल्याकारणाने निविदा खुल्या करण्यासंदर्भात निर्णय घेता आला नाही. परंतु भविष्यात या संदर्भात सर्व बाबींवर लवकरात लवकर निर्णय घेण्यात येऊन प्राप्त निविदांवरच पुढील कार्यवाही करण्यात येईल असे लेखी स्वरूपात आश्वासन नगरपंचायतीचे प्रभारी मुख्याधिकारी देवेंद्रसिंह परदेशी यांनी अन्नत्याग आंदोलन करत्या महिला लोकप्रतिनिधींना दिले आहे.**

**वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रभागातील समस्यांच्या सोडवणुकीसाठी लेखी स्वरुपात आश्वासन दिल्यानंतर आमचे अण्णत्याग आंदोलन मागे घेतले असून यापुढे केवळ आश्वासन देत बोळवण करण्याचा प्रयत्न झाल्यास प्रभागातील समस्यांच्या सोडवणुकीसाठी तीव्र स्वरुपाचे आंदोलन करण्याची आमची मानसिकता आहे. यापुढे देखील प्रभागातील कामासाठी आम्ही प्रयत्नशील राहणार आहोत.**

**मनीषा महेंद्र देसले**
**नगरसेविका, नगरपंचायत साक्री**

# साठे बिस्किट बस स्टॉपचे नामांतर करून साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचे नाव देण्याची मागणी

राज रावणगांवकर
हडपसर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------



विश्रांतवाडी भागातील सर्व पक्षीय कार्यकर्त्यांनी, साठे बिस्किट बस स्टॉपचे नामांतर करून साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचे नाव देण्यात यावे यासंदर्भात पुणे महानगरपालिका आयुक्तांना निवेदन देण्यात आले. यावेळी काँग्रेसचे सचिन भोसले आम आदमी पार्टीचे अमित महस्के. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ( श .प. गट) चे सुभाष ठोकळे. डॉक्टर योगेश कदम. लहुजी सैन्याचे शुभम वाघमारे, हा.का.कैलास गोंधळे, हितेश पाटोळे, सनीराव उमेश मसुरी, नंदू राक्षे, किरण खंडागळे उपस्थित होते

# भाजपचे मो. राजा भाई खान यांची उपसरपंचपदी भक्कम निवड! ग्रामविकासासाठी प्रभावी कार्याचा निर्धार

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

----------------------



मुंडीपार ग्रामपंचायतीमध्ये दिनांक १४ जुलै २०२५ रोजी पार पडलेल्या उपसरपंच पदाच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते, सामाजिक कार्यात सतत पुढाकार घेणारे आणि जनतेच्या मनात विशेष स्थान असलेले मो. राजा भाई खान यांची एकमताने उपसरपंचपदी निवड करण्यात आली.या निवडीमुळे ग्रामपंचायतीच्या कामकाजात नवचैतन्य येईल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. भाजपच्या मजबूत संघटन रचनेवर आणि स्थानिक जनतेच्या विश्वासावर मिळालेला हा विजय मो. राजा भाई खान यांच्या सर्वसमावेशक नेतृत्वाची पोचपावती मानली जात आहे. मो. राजा भाई खान हे पारदर्शक, लोकाभिमुख प्रशासनाचे पुरस्कर्ते असून त्यांनी यापूर्वीही विविध सामाजिक उपक्रमांतून आपली बांधिलकी सिद्ध केली आहे. त्यांच्या निवडीनंतर त्यांनी म्हटले की, "ग्रामविकास, सुशासन आणि सर्वसामान्यांचा सन्मान, हेच आमचे ध्येय राहील." या निवडीनंतर मुंडीपार गावात उत्साहाचे वातावरण असून, ग्रामस्थ, कार्यकर्ते, आणि हितचिंतकांमध्ये आनंदाची लहर पसरली आहे. भाजपच्या वतीने मो. राजा भाई खान यांचे अभिनंदन करत भावी वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# जिल्हा परिषद सदस्य श्री. जगदीशजी (बालूभाऊ) बावनथळे यांच्या हस्ते सुकडी आरोग्य केंद्रास रुग्णवाहिकेचे लोकार्पण

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

------------------------



तिरोडा विधानसभा क्षेत्रातील सर्वाधिक चर्चेत असलेल्या सुकडी जिल्हा परिषद क्षेत्रातील प्राथमिक आरोग्य केंद्राला अखेर रुग्णवाहिका मिळाली असून, याचे लोकार्पण दिनांक १४ जुलै २०२५ रोजी पार पडले.

या रुग्णवाहिकेचा लाभ परिसरातील नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ आरोग्य सेवा मिळवून देण्यासाठी होणार आहे.

ही रुग्णवाहिका जिल्हा परिषद सदस्य तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष मा. श्री. जगदीशजी (बालूभाऊ) बावनथळे यांच्या अथक प्रयत्नातून मंजूर करण्यात आली. त्यांच्या या कार्याबद्दल स्थानिक ग्रामस्थांनी त्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

गेल्या अनेक वर्षांपासून राजकारणाच्या माध्यमातून जनतेची सेवा करणारे बालूभाऊ यांनी आरोग्य, शिक्षण, रोजगार अशा विविध मूलभूत गरजांवर लक्ष केंद्रित करत जनतेत विश्वासार्ह नेता म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली आहे.

रुग्णवाहिका लोकार्पणामुळे संपूर्ण परिसरात समाधान आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, आरोग्य सेवा अधिक सक्षम होणार आहे.

लोकार्पण सोहळ्याला उपस्थित मान्यवरांमध्ये:
दर्शना नंदा गवळी (तालुका आरोग्य अधिकारी), मा. सौ. कविताताई सोनेवाने (पंचायत समिती सदस्य), मा. सौ. आर.आर. पारधी (पंचायत समिती बांधकाम), मा. सौ. कनकलता काळे मॅडम (ICDS, तिरोडा), मा. श्री. सुनीलभाऊ मेश्राम (सरपंच सुकडी), मा. श्री. संदीपभाऊ कुर्वे (उपसरपंच सुकडी), मा. सौ. पुष्पलता गौतम (सरपंच आलेझरी), मा. सुरेशभाऊ रायकर, मा. प्रशांत ओके, मा. हर्षवर्धन मेश्राम, मा. पारस बावनथळे, डॉ. शिवकुमार हरिणखेडे, श्री. पी.एल. राऊत, सौ. छाया घाबरडे, कु. अर्चनाताई उके, कु. पल्लवी रामटेके, कु. मीनाक्षी बघेले, श्री. राधेश्याम पिंपळकर, मा. दुर्गेश्वरी कळम, मा. योगेश गुनेरिया, मा. सुनील भाले, मा. तेजस गुरव, मा. संजय लिल्हारे, कु. डॉ. लक्ष्मी पटले तसेच परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आमदार संजयजी पुराम यांच्याकडून सालेकसा तालुक्यातील प्रलंबित पुलांच्या कामांची पाहणी

## विभागीय अभियंते, सरपंच, पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत प्रत्यक्ष स्थळ भेट; काही कामांना मंजुरी, तर काही प्रस्तावित

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
--------------------------



आमगाव-देवरी विधानसभा क्षेत्राचे लोकप्रिय आमदार श्री संजयजी पुराम यांनी सालेकसा तालुक्यातील अनेक प्रलंबित व अत्यावश्यक पुलांची पाहणी केली. या कामांची स्थिती अनेक वर्षांपासून रखडलेली असून, स्थानिक जनतेच्या गरजा लक्षात घेता हे प्रकल्प तातडीने पूर्ण होणे गरजेचे असल्याचे आमदारांनी स्पष्ट केले.

पूल, रस्ते आणि रोड प्रकल्पांची माहिती घेताना आमदारांनी संबंधित अधिकारी, अभियंते, सरपंच व गावकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधला. त्यांनी प्रलंबित कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी यंत्रणेला गती देण्याचे निर्देश दिले. या दौऱ्यादरम्यान काही कामे मंजूर, तर काही प्रस्तावित असल्याचे सांगण्यात आले.

विशेष म्हणजे, "एक पेड मा के नाम" उपक्रमांतर्गत काही ठिकाणी वृक्षारोपणाचाही उपक्रम राबविण्यात आला.

या पाहणी दौऱ्यात भाजप तालुका अध्यक्ष श्री देवरामजी चुटे, नानवा ग्रामपंचायतीचे सरपंच श्री गौरीशंकरजी बिसेन, आदिवासी आघाडीचे महामंत्री श्री चंद्रसेनजी मरकाम, श्री संतोषजी मडावी, खोलगडचे सरपंच माणिकप्रसादजी कटरे, धानोलीच्या सरपंच सौ. उर्मिलाताई कटरे, माजी सरपंच रतनलालजी टेम्भरे, श्री कृष्णाजी कुरंजेकर, ग्रामपंचायत सदस्य, विभागीय अभियंते, भाजप पदाधिकारी व स्थानिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी आमदार संजयजी पुराम यांचा पुढाकार पुन्हा एकदा सकारात्मक पावले उचलत असल्याचे या पाहणी दौऱ्यातून दिसून आले.

# पिंपळनेर येथील इंदिरानगर जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना महंमदीभाई पिंपळनेर वाला यांच्यातर्फे शालेय साहित्य वाटप

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------



पिंपळनेर येथील जिल्हा परिषद मराठी शाळा इंदिरानगर या शाळेतील विद्यार्थ्यांना सामाजिक कार्यकर्ते महंमदीभाई पिंपळनेर वाला(मुसाजी सन्स) यांच्या तर्फे ६० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वही, पाटी, पेन वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पत्रकार सुभाष जगताप उपस्थित होते तर प्रमुख अतिथी म्हणून केंद्रप्रमुख दशरथ पाटील, सर, सहा.केंद्र प्रमुख संजय जाधव, , भायदास पाटील, मुख्याध्यापक किरण बेडसे,व शिक्षक वृंद उपस्थित होते.

यावेळी या शाळेतील लहान मुलगी गौरी शिंदे ,व नंदीची गांगुर्डे यांनी संविधान, हरिपाठ, पसायदान तसेच मराठी शाळेत शिक्षण का घ्यावे? इंग्लिश मीडियम मध्ये गरिबांच्या मुलांना पैसे नसल्याने शिक्षण मिळत नाही पण जिल्हा परिषदेच्या शाळेत आता इंग्लिश मीडियम प्रमाणे संपूर्ण साहित्य ,ड्रेस या सह सर्व साहित्य मोफत मिळते व जि प शाळेत विद्यार्थ्यांना सर्व अंगाने घडवले जाते. म्हणून आता पालकांनी जि प शाळेत मुलांना टाकावे असे येथील लहान बालक रिषी साळसुंदर याने आपले मनोगत व्यक्त केले.

मुख्याध्यापक किरण बेडसे यांनी मान्यवरांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला व म्हणाले पिंपळनेर येथील मुसाजी सन्स चे संचालक महंमदी भाई पिंपळनेरवाला यांचा नेहमी सामाजिक कार्यात हातभार लागत असतो गरीब,व दिव्यांग विद्यार्थ्यांना ते वर्षाला शिष्यवृत्ती ही देतात.शेवटी किरण बेडसे यांनी आभार मानले.

# जि.प. मुलींचे हायस्कूल, मुखेड गुणवत्तेसह उपक्रमांची दीपमाळ

## "शिक्षकाच्या खात्यात असते ज्ञानाचे बॅलन्स"-डॉ. दिलीप पुंडे यांचे प्रतिपादन

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------




मुखेड येथील जिल्हा परिषद हायस्कूल (मुलींचे) ही गुणवत्तापूर्ण शिक्षणासह विविध उपक्रम राबविणारी राज्यातील आदर्श शाळा म्हणून ओळखली जाते. जवळपास १६०० विद्यार्थिनींचे शिक्षण येथे सुरु आहे. 'पिएमश्री' योजनेअंतर्गत शाळेत आयोजित आरोग्य तपासणी शिबिर यशस्वीरित्या पार पडले. या वेळी मुखेड भूषण डॉ. दिलीप पुंडे यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना सांगितले की, "शाळांमध्ये इंग्रजी शिक्षण महत्त्वाचे आहेच, पण मराठी ही आपली मातृभाषा, तीही तितकीच जपली पाहिजे. येथे तुकोबांचे अभंग व राष्ट्रगीत विद्यार्थिनींच्या ओठांवर असल्याचे पाहून संस्कृतीचे जतन होत असल्याचा आनंद झाला." "शिक्षकाच्या खात्यात किती पैसे आहेत हे महत्त्वाचे नाही, तर त्याच्या विद्यार्थ्यांचे यश हाच त्याचा खरा बॅलन्स आहे," असे ते म्हणाले. विद्यार्थ्यांना मोठे व्हा, शिकून स्वतःचा आणि समाजाचा विकास करा, असे आवाहनही त्यांनी केले. शिबिराची सुरुवात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलन करून झाली. विद्यार्थिनींनी स्वागत गीत सादर करत उपस्थितांचे स्वागत केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. दिलीप पुंडे, तर उद्घाटक गटशिक्षणाधिकारी हामिद दौलताबादी होते. प्रमुख अतिथी म्हणून आयएमए अध्यक्ष डॉ. रामराव श्रिरामे, डॉ. एम.जे. इंगोले, शिक्षण विस्तार अधिकारी शिवाजीराव येवतीकर, मुख्याध्यापक डी.जे. कांबळे व इतर मान्यवरांची उपस्थिती होती. डॉक्टरांनी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करून मोफत औषधे वाटप केले. कार्यक्रमात विद्यार्थिनींच्या लेझीम पथकाने ढोल-ताशांच्या गजरात अतिथींचे स्वागत केले. सूत्रसंचालन दिलीप देवकांबळे व सौ. सुरेखा हराळे यांनी केले. प्रस्तावना मुख्याध्यापक कांबळे यांनी केली व आभार प्रदर्शन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महेताब शेख यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व समिती सदस्यांचे मोलाचे योगदान लाभले.

शतायुषी हो बाळा..
दैनिक स्वराज्यदूत सादर करीत आहे एक नवीन सदर....
आपल्या चिमुरड्याच्या वाढदिवसाला आम्ही देऊ प्रसिद्धी
फक्त आणि फक्त १५०/ रुपयात... तर मग पाठवा आपल्या
चिमुरड्याचा फोटो आणि शुभेच्छुक यांचे नाव आमच्या नंबरवर
आणि साजरा करा आपल्या चिमुरड्याचा वाढदिवस
दैनिक स्वराज्यदुतच्या लाखो वाचकांसह
आपल्या चिमुकल्याचे वाढदिवसाचे फोटो पाठविण्यासाठी मोबा. नंबर ८४४६६७३६७७

# जिल्ह्यातील कांदा उत्पादकांना न्याय देण्यासाठी खा. डॉ. शोभाताई बच्छाव यांना शेतकरी संघटनेचे साकडे

किशोर सोनवणे
दैनिक स्वराज्यदूत
----------------------



खासदार डॉ. शोभाताई बच्छाव या बागलाण तालुक्याच्या विविध कामानिमित्त आल्या होत्या, त्या प्रसंगी कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी शेतकरी संघटनेचे व स्वतंत्र भारत पक्षाचे पदाधिकारी प्रवीण अहिरे, केशव सूर्यवंशी, देविदास अहिरे, किरण मोरे, राजीवदादा सावंत, विनोद पाटील, भिका सूर्यवंशी, नयन सोनवणे, देविदास सोनवणे, बापू बागुल, पोपटराव अहिरे, माणिक निकम, भिकानाना सोनवणे, मोठाभाऊ अहिरे, शांताराम अहिरे, भास्कर बागुल,व त्याच बरोबर इतर सह पदाधिकारी हजर होते,

यांनी कांदा उत्पादकांच्या विविध अडचणी डॉ. शोभाताई बच्छाव यांच्याकडे मांडल्या, आणि ताईंनी येत्या २१ तारखेला संसदेचे अधिवेशन असून या कांदा उत्पादकांच्या महत्त्वपूर्ण अडचणी सभागृहात मांडण्यासाठी मी कटिबध्द राहीन व लवकरच केंद्रिय कृषी मंत्री तसेच विरोधी पक्षनेते खासदार राहुलजी गांधी यांच्याकडे सुद्धा प्रत्यक्ष भेट घेऊन कांदा उत्पादकांच्या भावना अडचणी मांडणार असल्याची माहिती खासदार शोभाताई बच्छाव यांनी शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळासमोर व्यक्त केली, सुमारे एक तास सविस्तर चर्चा झाली, श्री विनोद पाटील यांनी सर्व पदाधिकाऱ्यांचा परिचय करून सूत्रसंचलन व आभार मानले या वेळी मोठ्या प्रमाणात शेतकरी हजर होते.

# नांदगाव येथे बांधकाम कामगारांसाठी संसार उपयोगी भांडे व सुरक्षा संच वाटप

सोमनाथ घोगांणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
--------------------------



नांदगाव येथे आ. सुहास कांदे यांच्या विशेष प्रयत्नातून, महाराष्ट्र इमारत बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांच्यातर्फे आज १०५ नोंदणीकृत बांधकाम कामगारांना संसारोपयोगी भांडे व सुरक्षा संच वाटप करण्यात आले. कार्यक्रमात उपस्थित कामगार बंधू-भगिनींना दैनंदिन गरजांसाठी उपयुक्त भांडी संच, तसेच कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेसाठी आवश्यक असणारे सुरक्षा साहित्य वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे अनेक बांधकाम कामगारांना प्रत्यक्ष लाभ मिळून, त्यांच्या दैनंदिन जीवनात उपयोगी ठरणारा आधार मिळाला.

यावेळी शिवसेना नांदगाव शहर प्रमुख सुनील जाधव, भाऊराव बागुल, एन के राठोड, तानसेन जगताप, महेंद्र आहेर, चेतन मोरे, कल्पेश निकम आदींचे बांधकाम कामगार बांधव व भगिनी उपस्थित होते .

# कर्म. आ. मा. पाटील वरिष्ठ महाविद्यालयात करिअर कट्टा अंतर्गत करियर संसदेची स्थापना व शपथग्रहण समारंभ संपन्न

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------------



पिंपळनेर येथील कर्म.आ.मा.पाटील कला, वाणिज्य व कै.अण्णासाहेब एन.के.पाटील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या 'करिअर कट्टा' या उपक्रमांतर्गत महाविद्यालयामध्ये करिअर संसदेची स्थापना करण्यात आली. त्याचबरोबर आज महाविद्यालयामध्ये महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या पत्रान्वये करिअर संसदेच्या पदाधिकाऱ्यांना शपथग्रहण समारंभ आयोजित करून शपथ देण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य व समारंभाचे अध्यक्ष प्रा.डॉ. लहू पवार, करिअर कट्टा समन्वयक प्रा. डॉ. सतीश मस्के व करियर कट्टा सहसमन्वयक प्रा.सी.एन. घरटे आदी उपस्थित होते.

कर्म.आ.मा.पाटील वरिष्ठ महाविद्यालयाच्या या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. लहू पवार म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी करिअर कट्टा हे अतिशय महत्त्वाचे माध्यम आहे. विद्यार्थ्यांनी या करिअर कट्ट्याशी जुळून राहून आपला व्यक्तिमत्व विकास साधायला हवा. त्यामध्ये विविध मान्यवरांचे विविध व्याख्याने आयोजित केली जातात. त्याचबरोबर करिअर कट्टा समन्वयक प्रा. डॉ. सतीश मस्के म्हणाले की, करिअर कट्टा यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये अमुलाग्र बदल होण्यास मदत होते.त्यामध्ये विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांना कसे सामोरे जावे, उद्योग व्यवसायात कशी भरभराट करावी, स्वतःचा व्यक्तिमत्व विकास कसा करावा याविषयीचे सखोल असे मार्गदर्शन केले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त यामध्ये सहभागी होऊन फायदा घेणे गरजेचे आहे. या कार्यक्रमात मुख्यमंत्री म्हणून सानिका बिपिनचंद्र भदाणे, माहिती व प्रसारण मंत्री म्हणून आएशा अनिस अहमद, कायदे व शिस्तपालन मंत्री आरती राजेंद्र पवार, महिला व बाल कल्याण मंत्री तेजस्विनी महेश सोनवणे, उद्योजकता विकास मंत्री पल्लवी अरुण सोमवंशी व कौशल्य विकास मंत्री प्रियंका निंबा अहिरे त्याचबरोबर रोशनी पाथरे, रोशनी साबळे, करीना चव्हाण, मुस्तनशीर बोहरी, नकुल वाघ व यशराज शेजुळ आदी विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना करिअर कट्टा डायरी, नियुक्तीपत्र व बॅजेस देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करिअर कट्टा समन्वयक प्रा. डॉ. सतीश मस्के यांनी केले. आभार करिअर कट्टा सहसमन्वयक प्रा.सी.एन. घरटे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मिलिंद कोठावदे, सुनील पवार, कैलास जिरे आदीनी मदत केली.

# आंदोलकांचे प्रशासनासह सत्ताधाऱ्यांविरुध्द भारुड – काही जणांकडून अन्नत्याग

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
--------------------------




प्रशासनाने मागण्या मान्य कराव्यात, या हट्टाला पेटलेल्या महाराष्ट्र राज्य रोजंदारी वर्ग तीन, वर्ग चार कर्मचारी संघटनेने आदिवासी विकास भवनासमोर दिलेला ठिय्या सातव्या दिवशी कायम राहिला. आंदोलकांकडून कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी मोठ्या प्रमाणावर बंदोबस्त तैनात करण्यात आल्याने आदिवासी विकास भवनाला छावणीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. दुसरीकडे, आंदोलकांनी आता मागण्या मान्य होईपर्यंत अन्नत्याग करण्याचा इशारा दिला आहे.

मागण्या मान्य होत नसल्याने मंगळवारी आंदोलकांनी भारूड सादर करुन प्रशासनासह सत्ताधाऱ्यांवर टीका केली. यानंतर आंदोलकांनी एकत्र येत आदिवासी आयुक्त कार्यालयात शिरण्याचा प्रयत्न केला. परंतु, पोलीस बळापुढे त्यांचा हा प्रयत्न असफल ठरला. त्यामुळे आंदोलकांनी त्याच ठिकाणी ठिय्या देत घोषणाबाजी सुरू केली.

पाऊस आणि उघड्यावरील मुक्कामामुळे आतापर्यंत सहा आंदोलकांना रक्तदाब कमी-जास्त होण्यासह अन्य काही तक्रारींना तोंड द्यावे लागले. काही जणांना जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारानंतर त्यांच्यापैकी काही जणांना सोडण्यात आले. मंगळवारी आंदोलकांना त्रास झाल्यानंतर महानगरपालिकेची रुग्णवाहिका आंदोलनस्थळी आली. परंतु, रुग्णवाहिकेत कचरा होता. रुग्णांना ने-आण करण्यासाठी स्ट्रेचर नव्हते. रक्तदाब तपासण्यासाठी आणलेले यंत्र बंद होते, अशा वेगवेगळ्या तक्रारी आंदोलकांकडून करण्यात आल्या. प्रशासनाकडून दाखविण्यात येत असलेल्या अनास्थेमुळे आंदोलकांनी उपचार घेण्यास नकार दिला. काही संघटना, लोकप्रतिनिधी यांच्याकडून आंदोलकांना आतापर्यंत जेवण देण्यात येत होते. आंदोलकांनी आणलेला काही शिधाही होता. परंतु, आंदोलन सातव्या दिवशीही कायम राहिल्याने मदतीचा ओघ कमी झाला. आंदोलकांनी मागण्या मान्य होईपर्यंत ठिय्या कायम राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे. आंदोलकांनी सोमवारी रात्रीचे जेवण घेतले. मंगळवारी ते दुपारपर्यंत उपाशी होते. आंदोलकांपैकी काही जणांनी अन्नत्याग केले आहे.

दरम्यान, आंदोलन काळात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी नाशिक शहर पोलिसांच्या वतीने शहरातील वेगवेगळ्या पोलीस ठाण्यातून मोठ्या प्रमाणावर बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. साधारणत: हजार पोलीस कर्मचारी वेगवेगळ्या सत्रात कार्यरत आहेत

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist- Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक स्वराज्यदूत वृत्तपत्रातर्फे राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन !

## स्वराज्यदूत गौरव पुरस्कार

कर्तृत्वाचा सन्मान... स्वराज्याचा मान !!




महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, उद्योग, वैद्यकीय, पत्रकारिता (वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक / डिजीटल मीडिया), युवक, महिला, कला, साहित्य, क्रीडा, पर्यावरण, ग्रामविकास अशा विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनिय कार्य करणाऱ्या संस्था व मान्यवर व्यक्तींच्या कार्याचा विशेष सन्मान करून भावी वाटचालीस तसेच उल्लेखनिय कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून दैनिक स्वराज्यदूतने हा पुरस्कार आयोजित केलेला आहे.

कौतुक तुमच्या कार्याचे

दैनिक स्वराज्यदूत SWARAJYADOOT
www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!

SWARAJYADOOT LIVE

दैनिक वृत्तपत्र
वृत्त वाहिनी

ऑगस्ट महिन्यात नाशिक येथे अतिशय भव्य-दिव्य समारंभात पुरस्कार वितरण नियोजित

### प्रस्ताव पाठविण्यासंदर्भात सूचना

- संपूर्ण प्रस्ताव pdf स्वरुपात संगणकावर तयार केलेल्या स्वरुपात दि. ३१ जुलै २०२५ पर्यंत फक्त Google Form द्वारेच पाठवायचा आहे. गुगल फॉर्म लिंक 8446673677 या व्हॉटसअप वर उपलब्ध केली आहे. उपलब्ध झाली नसेल तर तशी मागणी करू शकतात.
- फक्त निवड झालेल्या व्यक्तींना प्रस्तावाची प्रिंट स्वरुपात (Hard copy) जमा करावी लागेल.
- प्रस्ताव पूर्णपणे मोफत स्वीकारले जातील. कोणताही आर्थिक मोबदला देण्याचा प्रयत्न करू नये. पुरस्कारासाठी कुणाशीही आर्थिक व्यवहार करू नये.
- दैनिक स्वराज्यदूत परिवाराशी संबंधित व्यक्ती, प्रतिनिधी यांना प्रस्ताव पाठवता येणार नाहीत.
- जिल्हा परिषद कर्मचारी, राज्य व केंद्र सरकारचे कर्मचारी यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही.

अधिक माहितीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.

**8446673677 / 8010232449**